ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - XIII Issue - I January - March - 2024

ENGLISH / MARATHI PART - I

**Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal**
**Journal No. 40776**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING
2023 - 7.428**
**www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned with OKEN Scanner

## CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | कुलदेवत संकल्पना व स्वरूप<br>**आराधना सुधीर गुरव**<br>**डॉ. नागोराव सोमवंशी** | १-३ |
| २ | धनगर समाजाच्या लोकसमजुती व लोककथा<br>**बेबी केशव खोरणे** | ४-१० |
| ३ | आडगाव (ता. एरंडोल जि. जळगाव) येथील शेषशाही दशावतार विष्णूमूर्ती<br>**दिपक बाबुलाल शिरसाट** | ११-१७ |
| ४ | दख्खनचा राजा ज्योतिबा<br>**डॉ. बी. डी. इंगवले** | १८-२३ |
| ५ | देवराई एक सांस्कृतिक परंपरा<br>**प्रा. हरेंद्र विनायक सोष्टे** | २४-३० |
| ६ | जत्रा व उत्सव एक समाजशास्त्रीय अध्ययन<br>**डॉ. ज्योती अरविंद पोटे** | ३१-३६ |
| ७ | लोकसमजुत : दृष्टीबाधा<br>**प्रा. कैलास कळकटे** | ३७-३९ |
| ८ | मराठ्यांचे आरमार आणि तळकोकणातील स्थानीय देवता : राजकीय-सांस्कृतिक अनुबंध<br>**नचिकेत पराडकर** | ४०-४५ |
| ९ | तेलंगवाडी पंचक्रोशीतील ग्रामदैवत : श्री. वेताळ बाबा<br>**डॉ. नवनाथ विश्वनाथ पोटोळे** | ४६-४८ |
| १० | ग्रामीण भागातील ग्रामदेवता एक वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक रुढी व परंपरा<br>**श्री. प्रभुदास रामदास बेराळे** | ४९-५७ |
| ११ | श्री. सिद्धेश्वर मंदिर, शिदोवा<br>**प्रणाली उल्हास पष्टे**<br>**अंकिता तानाजी हरड** | ५८-६० |
| १२ | आगरी समाजातील ग्रामदेवाता व स्थानिक देवता<br>**श्री. सचिन विठ्ठल वायले**<br>**डॉ. चंद्रकांत गोंधळी** | ६१-६६ |






CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | श्री सिद्धनाथ व माता जोगेश्वरी श्री क्षेत्र दक्षिण काशी म्हसवड<br>**डॉ. सुनिलदत्त एस. गवरे** | ६७-७० |
| १४ | श्री क्षेत्र टाकेश्वर, श्री गुरु रिद्धीनाथ बाबा समाधी मंदिर<br>**श्वेता संजय यशवंतराव**<br>**अंकिता वसंत शिंगोळे** | ७१-७४ |
| १५ | गौरी-सण आणि नृत्य<br>**सहा. प्रा. अश्विनी पतंगे** | ७५-८२ |
| १६ | दक्षिण कोकणातील गावऱ्हाटी<br>**डॉ. जयवंत विष्णू पाताडे** | ८३-८८ |
| १७ | कोकणातील जंभारीचे ग्रामदैवत श्री देव भैरी<br>**प्रा. कविता जयराम दवंड-काटकर** | ८९-९२ |
| १८ | ग्रामदेवतांच्या उत्सवाची परंपरा आणि तमाशा या प्रयोगात्मक लोककलेची क्षेत्रीय विविधता<br>**प्रा. महेश भाऊ थोरात** | ९३-९९ |
| १९ | मासले-बेलपाडा गावचे ग्रामदैवत – "श्री खांबदेव"<br>**कु. सायली शरद भोंडवे**<br>**कु. पल्लवी दशरथ गोडांबे** | १००-१०२ |




Scanned with OKEN Scanner

# ४. दख्खनचा राजा ज्योतिबा

**डॉ. बी. डी. इंगवले**
अर्थशास्त्र विभाग, प्रमुख आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
वैभववाडी, तालुका-वैभववाडी, जिल्हा-सिंधुदुर्ग.

**Abstract**

ज्योतिबाच्या नावाने चांगभलं!असा गजर, ऐतिहासिक दृष्ट्या कोल्हापूरला जेवढे महत्त्व आहे तितकेच धार्मिक दृष्ट्या कोल्हापूरला महत्व आहे दख्खनचा राजा हे महाराष्ट्रातील अनेक कुटुंबाचे कुलदैवत आहे.यालाच दक्षिण काशी म्हणूनही ओळखले जाते.या ठिकाणाला वाडी रत्नागिरी असे म्हणतात. भाविक आपल्या शुभ कामाची सुरुवात ज्योतिबाच्या दर्शनानेच करतात.दख्खनच्या राजाला गुलाल आणि खोबऱ्या बरोबरच त्रिगुणात्मक असणारी वनस्पती दवणा ही वनस्पती वाहण्याची परंपरा आहे दवणा ही वनस्पती केदारनाथला प्रिय आहे. दवणा ही वनस्पती वात, कप, पित्त, या तीन दोषावर गुणकारक आहे, जसे केदारनाथ हे ब्रह्म, विष्णू, आणि महेश यांचे त्रिगुणात्मक आहे. तसे दवणा ही वनस्पती त्रिगुणात्मक आहे. ज्योतिबा या देवाला ज्योतिर्लिंग, केदारलिंग, रवळनाथ, सौदागर, अशा नावाने ओळखतात. येथे कोणतेही अंधश्रद्धा, पशु बळी, अघोरी कृत्य, केले जात नाही. अग्नी, तेज व ज्ञानाचे प्रतीक असलेल्या ज्योतिबा भक्तांना आपलासा वाटतो, ग्रामीण लोकगीतातून व ओव्यातून ज्योतिबाला मानाचे स्थान प्राप्त झालेले आहे" देवा मंदी देव ज्योतिबा लय मोठा, चैताच्या महिन्यात त्याच्या फुलल्या चारी वाटा!"

**Keywards -** दख्खनचा राजा ज्योतिबा याच ठिकाणाला दक्षिण काशी म्हणून ओळखले जाते. "ज्योतिबाच्या नावाने चांगभलं!"

**प्रस्तावना**

कोल्हापूर येथील श्री ज्योतिबा देवस्थान महाराष्ट्राचे लोकदैवत म्हणून प्रसिद्ध आहे. समुद्रसपाटीपासून 3100 फूट उंचीवरील या ज्योतिबा डोंगराचा परिसर हा निसर्ग सौंदर्याने नटलेला आहे. कोल्हापूर जिल्ह्याच्या वैभवात तसेच भौतिक व ऐतिहासिक ऐश्वर्यात मोलाची भर घालणाऱ्या या तीर्थक्षेत्रीय परिसर वाडी रत्नागिरी या नावाने परिचित असलेल्या जोतिबा देवस्थान हे कोल्हापूरच्या वायव्येस 17.5 किलोमीटर अंतरावर आहे.

सह्याद्रीच्या फाटा पन्हाळागड,पावनगड असा जो मार्ग गेला आहे त्याच्यापुढे सोंडेसारखा शंकाकृती भाग जो वर गेलेला दिसून येतो, तोच जोतिबाचा डोंगर या डोंगरावर प्राचीन काळापासून प्रसिद्ध असलेले हे ज्योतिबाचे पुरातन मंदिर आहे. पहाटेच्या वेळी येथील वातावरण खूपच प्रसन्न आणि अल्हाददायक असते.





**अभ्यासाची उद्दिष्टे**

1. हिंदू धर्म पद्धतीतील पूज्य अशा धार्मिक स्थळांचा अभ्यास करणे
2. कोल्हापूरचा दख्खनचा राजा जोतिबा या पर्यटन स्थळाचा अभ्यास करणे.
3. कोल्हापूरचा दख्खनचा राजा ज्योतिबा या धार्मिक स्थळाचे महत्व अभ्यासणे.

**संशोधन पद्धती**

सदर शोधनिबंधासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक आशा दुय्यम संशोधन पद्धतीचा अभ्यासाकरिता वापर करण्यात आलेला आहे. सदर शोध निबंधासाठी आवश्यक असणारी संशोधनात्मक माहिती विविध धार्मिक ग्रंथ, ज्योतिबा विकिपीडिया, सांकेतिक स्थळ यांच्या माध्यमातून घेण्यात आलेली आहे.येथे शोधनिबंधा साठी दुय्यम सामग्रीचा आधार घेण्यात आलेला आहे.

**दख्खनचा राजा ज्योतिबा या धार्मिक स्थळाचे महत्व**

ज्योतिबा मंदिर हे महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर जिल्ह्यातील मंदिर आहे.ज्योतिबा या देवतेला ज्योतिर्लिंग, केदारलिंग, रवळनाथ, सौदागर, अशा विविध नावाने ओळखले जाते. दक्षिण काशी म्हणून भारतभर कीर्ती असलेल्या करवीर पीठास धर्मशास्त्रात अन्यन साधारणअसे महत्त्व आहे. दख्खनचा राजा श्री ज्योतिर्लिंग, श्री कात्यायनी देवी, वाडी येथील श्री क्षेत्र दत्त मंदिर, बाहुबली येथील जैन धर्मियांचे पवित्र क्षेत्र, त्याचप्रमाणे ऐतिहासिक पन्हाळागड, विशाळगड इत्यादी धर्मस्थळामुळे कोल्हापूरचा नाव लौकिक झाला आहे.त्यामुळे कोल्हापुरास अलौकिक स्थान, महत्व, महात्म प्राप्त झाले आहे. या धर्मस्थळापैकी वाडी रत्नागिरी येथील श्री ज्योतिबा देवस्थान महाराष्ट्राचे लोकदैवत म्हणून प्रसिद्ध आहे.याचे महत्त्व व पूर्वपिटिका डोंगरावरील उंच सकल भागास वाडी रत्नागिरीचे गावठाण वसले असून सुमारे पाच हजार लोकवस्तीच्या या गावात 99% लोक गुरव समाजाचे आहेत. या देवालयास देवताकुत्य, नारळ, गुलाल, मेवा मिठाई, यांचे दुकाने यावरच या गुरव समाजाची गुजराण होते.

श्री ज्योतिबा अथवा केदारनाथ हे बद्रीकेदार नाथाचे रूप आहे. ब्रह्मा, विष्णु, महेश आणि जगतदामी या सर्वांचा मिळून एक तेजपुंज अवतार म्हणजे ज्योतिबा किंवा केदारनाथ!ज्योतिबा या नावाची उत्पती ज्योत या शब्दापासून झाली,असून ज्योत म्हणजे तेज, प्रकाश,वायू, तेज,आप, ( पाणी )आकाश व पृथ्वी या पंचमहाभूतांपैकी तेजाचे शक्ती दैवत म्हणजे वाडी रत्नागिरी चा ज्योतिबा! पौगंड ऋषीच्या वंशाला दिवा नव्हता त्यांनी तपश्चर्या करून बद्रीनाथांना संतुष्ट केले.बद्रीनाथाची ऋषी व त्याची पत्नी विमलाबुजा यांच्या पोटी जन्माला येण्याचे वचन दिले. त्याप्रमाणे चैत्रशुद्ध षष्ठीच्या मुहूर्तावर स्वतः आठ वर्षाची बालमूर्ती होऊन बद्रीनाथ हे ऋषी दापत्यासमोर अवतरले,ही बालमूर्ती बद्रीनाथची प्राणज्योत म्हणून त्याचे नाव ज्योतिबा असे ठेवले. आपला पुत्र हा जगात करता करविता व गरिबांचा कैवारी असावा, अशी विमलाबुजांची तीव्र इच्छा होती.त्याप्रमाणे तिच्या ओंजळीत केदारनाथाची प्राणज्योत प्रगट झाली,ते तेच ज्योतिबाचे रूप होय. श्री ज्योतिबाला गुलाल, दवणा, खोबरे,व खारीक,प्रियेअसून त्यांच्या दवण्याला गंध हा सत्व, रज, तम, गुणयुक्त आहे.

**दख्खनचा राजा ज्योतिबाचे उगमस्थान**

ज्योतिबा संदर्भात एक कथा आहे,प्राचीन काळात कोल्हापूर परिसरात दैत्यानी अहंकार माजवला होता. येथील जनता त्यांच्या छळाला कंटाळून गेली होती कोल्हापूरच्या अंबाबाईलाही या दैत्यानी त्रास द्यायला सुरुवात केली होती.या राक्षसांच्या छळापासून लोकांची मुक्तता करण्यासाठी अंबाबाईने तपश्चर्या करून केदारेश्वराला या दैत्यांचा संहार करण्याची विनंती केली. केदारेश्वराने राक्षसांशी युद्ध करून प्रमुख राक्षस रत्न सुराचा वध या डोंगरावर केला म्हणून या डोंगराचे नाव वाडी रत्नागिरी असे पडले रत्नासुराच्या वधा नंतर अंबाबाईने अशी प्रार्थना केली की पुन्हा असे संकट येऊ नये, म्हणून अंबाबाईच्या रक्षणाकरिता ज्योतिबाचे मंदिर कोल्हापूरच्या दक्षिणाभिमुख आहे.

**ज्योतिबाच्या मंदिराची रचना**

श्री. ज्योतिबाचे आज जे मोठे मंदिर दिसते आहे,त्या ठिकाणी पूर्वी छोटेसे देवालय होते. मूळ मंदिर कराड जवळच्या किवा किवळ येथील नवजीबुवा साळुंखे केवळकर संत (नावजीनाथ )नामक भक्ताने बांधले व आज जे देवालय आहे. ते इसवी सन 1730 मध्ये ग्वाल्हेरचे महाराज राणोजीराव शिंदे यांनी या ठिकाणी भव्य स्वरूपात पुर्नरचित करून बांधले.

देवळाकडे जाताना प्रथम मराठा शैलीतील भव्य दगडी प्रवेशद्वार लागते.या प्रवेश दारातून प्रवेश केल्यानंतर पायऱ्या उतरताच तीन देवळांचा समूह दृष्टीस पडतो, या तीन देवळांच्या मध्यभागी केदारलिंगाचे मुख्य देवालय आहे. या मूळ देवालयाचे बांधकाम ज्योतिबा भक्त की किवळ गावच्या नावजीससे पाटलांनी (संत नावजी नाथ) यांनी केलेले आहे असे म्हणतात.1730 मध्ये राणोजी शिंदे यांनी या जागी आजचे देवालय बांधले हे देऊळ ५७ फूट लांब 37 फूट रुंद असून त्याच्या शिखराची उंची 77 फूट आहे.या देवळा शेजारी केदारेश्वराचे देवालय आहे. या देवालयाचे बांधकाम 1808 मध्ये दौलतराव शिंदे यांनी केलेले आहे.या देवळाची लांबी 48 फूट असून रुंदी 22 फूट आहे शिखर 89 फूट उंच आहे. केदारेश्वर देवळासमोर दोन पाषाणाचे नंदी आहेत. येथे असलेल्या रामलिंग मंदिराचे बांधकाम 1780 मध्ये मालजी निकम पन्हाळकर यांनी केलेले आहे. या मंदिराची लांबी 13 फूट आणि रुंदी 13 फूट असून शिखर 40 फूट उंच आहे. या देवाळा जवळ चोपडा देवीचे मंदिर असून या मंदिराचे बांधकाम 1750 मध्ये प्रीतीराव चव्हाण हिम्मतवाहादूर यांनी केलेले आहे. या देवळापासून थोड्या अंतरावर यमाई देवीचे मंदिर आहे. या मंदिराचे बांधकाम 1750 मध्ये राणोजीराव शिंदे यांनी केले आहे. या मंदिरासमोर पाण्याचे दोन तीर्थ असून जवळच सहा कुंड व दोन विहिरी आहेत.कोल्हापूर परिसरातील मंदिराच्या शिखराप्रमाणे येथील मंदिराच्या शिखराची रचना आहे. यादवकालीन वास्तुशालीत थोडा फरक करून जानेवारी मराठा कारागीरांनी या शिखराचे बांधकाम केले. या क्षेत्रावर तळापासून वरपर्यंत रथपट पद्धतीची साधी नशी आहेत.येथील मंदिर हेमाडपंती पद्धतीचे असून तत्कालीन मराठा वास्तुशैलीचा प्रभाव येथे आढळतो. या मंदिराच्या बांधकामाकरिता याच डोंगरावर सापडणाऱ्या काळ्या बेसाल्ट दगडाचा वापर करण्यात आलेला आहे. या देवालयाच्या प्रांगणात प्रारंपरिक दगडी दीपमाळ आहेत.





**ज्योतिबाची मूर्ती**

ज्योतिबाची मूर्ती काळ्या घोटीव पाषाणात घडवलेल्या या चतुरभुज मूर्तीच्या हातात खडक, पानपात्र,डमरू व त्रिशूल आहे. शेजारीच जोतिबाचे उपवाहन शेष आहे. जोतिबाचा शरीर रक्षक काळभैरव बाहेरच्या बाजूस असून तेथे मूळ ज्योत तेवत असते.ज्योतिबाचे दर्शन घेण्याअगोदर काळभैरव व ज्योतीचे दर्शन घेण्याची प्रथा आहे. ज्योतिबाची भार्या मयाई हिची मूर्ती दगडाची असून या मूर्तीला शेंदूर लपलेला असतो. येथील वाडी रत्नागिरी गावात पुजारी व दुकानदारांची घरे आहेत.

**ज्योतिबाची पूजा**

ज्योतिबा देवाची रोज तीन वेळा पूजा बांधली जाते पहिली साधी पूजा, सकाळच्या महाभिषेकापूर्वी दुसरी खडी पूजा, अभिषेकानंतर तिसरी पूजा बैठे असते,ती दुपारनंतर बांधण्यात येते. दर शनिवारी श्री ची दुपारी बारा ते तीन या वेळेत घोड्यावर बसलेली पूजा बांधली जाते.

**ज्योतिबाचा उत्सव**

ज्योतिबाच्या जन्मदिवशी रविवारी व श्रावण शुद्धषष्ठीला येथे भाविकांची मोठी गर्दी असते. रत्नासुरावर मिळवलेल्या विजया प्रित्यर्थ चैत्री पौर्णिमेस येथे भव्य जत्रा भरते. कर्नाटक, मध्य प्रदेश,महाराष्ट्र व देशाच्या इतर भागातून लाखो भाविक येथे गोळा होतात.ज्योतिबाचा डोंगर माणसाने अक्षरशा फुलून जातो.येथे धान्य, कपडा, तांब्या पितळेची भांडी,पूजा साहित्य, व मेवा,मिठाई इत्यादी साहित्याचे दुकाने थाटली जातात.चैत्री पौर्णिमेच्या दिवशी ज्योतिबाच्या मूर्तीचे मिरवणूक पालखीतून वाजत गाजत यमाई देवीच्या मंदिराकडे निघते. या मिरवणुकीत अनेक सासन काठ्या नाचवत नेल्या जातात.जोतिबाच्या यात्रेत पन्नास हून अधिक छोट्या-मोठ्यासासन काठ्या असतात.

**सासनकाठी मिरवणूक**

रत्नासुर व कोल्हापूर या राक्षसांनी अत्याचार सुरू केला होता. तेव्हा करवीर निवासनी श्री महालक्ष्मीने केदारनाथाचा (ज्योतिबाचा) धावा केला,तेव्हा ज्योतिबा देवाने राक्षसांचा संहार केला. हे राक्षस मेल्यावर मारल्यावर श्री महालक्ष्मी देवीचा राज्याभिषेक केदारनाथाने केला.व ते परत हिमालयाकडे जाण्यास निघाले, तेव्हा महालक्ष्मी व चोपडाई देवीने त्यांना वाडी रत्नागिरीवर परत आणले,व त्यांचा राज्याभिषेक केला. सोहळयास यमाई देवीस निमंत्रण देण्याचे विसरल्याने त्या रुसल्या,त्यांचा रुसवा काढण्यासाठी पूर्वी केदारनाथ औंध गावी जात होते. त्यावेळी यमाईदेवीने केदारनाथ सांगितले की तुम्ही आता मूळ पिठाकडे येऊ नका मीच वाडी रत्नागिरीवरील चापे बनात येते, तेव्हापासून केदारनाथच्या चैत्र पौर्णिमेस श्री यमाई देवीची भेट घेण्यासाठी शासनकाठी लाव्याजमास जातात हीच चैत्र यात्रा होय.

हस्त नक्षत्रावर दुपारी दीड वाजता सासन काठीच्या मिरवणुकीस प्रारंभ होतो.त्यावेळी देवस्थान कमिटीचे भालदार चोपदार पालकमंत्री तीर्थक्षेत्र पाडळी (निनाम) सासनकाठी एकचे पूजन करून संत नावजी नाथाच्या किवळकाठीस पानाचा विडा देऊन आमंत्रण देतात. तोफेच्या सालामीने मिरवणुकीस प्रारंभ होतो. या मिरवणुकीमध्ये क्रमवारी पहिला मान तीर्थक्षेत्र पाडळी (निनाम)

तालुका, जिल्हा, सातारा, या शासनकाठीनंतर मौजे विहे, तालुका, पाटण, करवीर कोल्हापूरची हिम्मत बहादुर चव्हाण, वाळवा तालुक्यातील करंजवडे, तालुका वाळवा, जिल्हा सांगली, गावातून येणारे मध्य प्रदेशातील ग्वाल्हेरच्या शिंदे, कोल्हापूर छत्रपती कसबा डिग्रज तालुका.मिरज.कसबा सांगाव तालुका कागल, किंवळ जिल्हा सातारा, कवठे एकंद जिल्हा सांगली, रेटरे बुद्रुक साळुंखे तालुका कराड.यांच्या मनाच्या 18 सासन काट्यात सहभागी होतात.

पहिला सासन काठीचा मान सातारा तालुक्यातील तीर्थक्षेत्र पाडळी गावचा आहे.गडद गुलाबी आणि पांढऱ्या रंगाचे उच्च रस्मी वस्त्र, धवळ रंगाचे गंगावन,सुती तोरण्या आणि बसण्यावर सुवर्ण पादुका असा साज असतो.या सासनकाठीला 18 देवसेवक असतात. तीर्थक्षेत्र पाडळी गावचे भक्त १२० किलोमीटर हुन जास्त अंतर ते वाडी रत्नागिरी येथे चार दिवसांमध्ये सासनकाठी पायी उचलून नेतात, परतीचा प्रवास मिळून हा प्रवास आठ दिवसाचा असतो. शासासनकाठीचा प्रवास सुरू असताना सासनकाठीचे वजन 300 किलो होऊन जास्त असते. यामध्ये सासनकाठी आणि श्रीफळाची तोरणे, धन,हारतूरे व तांबडी पागोटी, असे एक आड एक तिरपी गुंडाळलेले असतात.या बांबूच्या तळापासून चार ते पाच फूट उंचीवर आडवी फळी घट्ट बांधलेले असते.ही फळी खांद्यावर घेऊन भक्तगण काठी नाचवतात. या काठीचा तोल जाऊ नये म्हणून काठीला बांधलेले दोर ता ताणून लोक उभे असतात.या फळीवर घोड्याची व देवांची प्रतिमा ठेवलेले असते.ढोल ताशाच्या तालावर भक्तगण देहभान विसरून काट्या नाचत असतात,इतर काही महत्त्वाच्या मानाच्या सासनकाट्यामध्ये मौजे विहे, (पाटण) नावजी बाब किवळ,हिम्मतबहादूर चव्हाण, वाळवा तालुक्यातील कंजवडी गावातून येणारी ग्वाल्हेर शिंदे सरकारची सासनकाठी, कोल्हापूर छत्रपती या काट्यांचा समावेश होतो.मानाच्या 18 व एकूण 96 सासन काट्या उत्सवात सहभागी होतात. पूर्वी ज्योतिबा देवस्थानास शिंदे सरकारकडून अनुदान मिळत असे, सध्या इनामी गावच्या उत्पन्नातून देवस्थानचा खर्च भागविण्यात येतो.

**निष्कर्ष**

कोल्हापूर येथील दख्खनचा ज्योतिबा देवस्थान हे महाराष्ट्राचे लोकदैवत म्हणून प्रसिद्ध आहे.श्री ज्योतिबा अथवा केदारेश्वर हे वद्रिकेदारचे रूप आहे. ब्रह्मा, विष्णू, महेश, आणि जग जगत दामिनी या सर्वांचा मिळून एक तेज पुंजावतार म्हणजेच ज्योतिबा किंवा केदारनाथ होय. वायु, तेज, पाणी, आकाश व पृथ्वी या पंचमहाभूतांपैकी तेजाचे शक्ती दैवत म्हणजे वाडी रत्नागिरीचा ज्योतिबा. ज्योतिवा देवाची मूर्ती स्वयंभू असून ती साधारणपणे साडेचार फूट उंचीची आहे.चैत्र-यात्रे दिवशी सासनकाठी व पालखी सोहळा सह यात्रा भरते, जोतिबाच्या धार्मिक विधीत उंट, घोडे, हत्ती पूर्वीपासून यांना फार मोठा मान आहे. चैत्रकाळात तीन दिवस श्रावण षष्ठी यात्रेत, चैत्र षष्ठीस, ललित सोहळयास, विजयादशमीच्या जागर, या दिवशी ज्योतिबा मंदिर दिवस-रात्र खुले असते. श्री ज्योतिबा मंदिर, श्री नरसिंह वाडी दत्त मंदिर, बाहुबली मंदिर, ऐतिहासिक पन्हाळा, विशाळगड, या धर्मस्थळामुळे कोल्हापूरचा लौकीक झाला आहे. त्यामुळे कोल्हापुरास अलौकिक महत्त्व प्राप्त झाले आहे. चैत्र पौर्णिमेस येथे भव्य यात्रा भरते कर्नाटक, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, व देशाच्या इतर भागातून लाखो भाविकांमुळे ज्योतिबाचा डोंगर माणसांनी अक्षरशा फुलून जातो. दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असणारे नवसाला पावणारे असे हे जागृत देवस्थान आहे.





**संदर्भसूची**

1. ज्योतिबा मंदिरास प्रत्यक्ष भेट.
2. बॉम्बे गॅझेटिअर कोल्हापूर जिल्हा.
3. कुलदैवत महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग प्रशासन 1974
4. महाराष्ट्राचे पर्यटन मंडळाच्या संकेतस्थळावरील माहिती.
5. Temple of Maharashtra -- G K Kanhere.
6. Gaikwad Priyanka --- कोल्हापूरचा ज्योतिबा (इंग्रजी भाषेत).



Scanned with OKEN Scanner